VOLUME - XI, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2022
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)**

# ७. महात्मा गांधींची ग्रामस्वराज्याची संकल्पना आणि दलित

**राहुल नरंगलकर**
सा. प्राध्यापक, राज्यशास्त्र अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे.

गावातील सार्वजनिक जीवन व्यवहार हा संपूर्णत: किंवा बव्हंशी त्या गावातील रहिवाशांच्या संमतीने, सहकार्याने आणि सल्ल्यानुसार चालत असल्यास, तेथे ग्रामराज्य अस्तित्वात आहे असे समजले जाते. महात्मा गांधींनी ग्रामोद्धाराकरिता ज्या विविध विधायक योजना देशापुढे मांडल्या, त्यांपैकी ग्रामस्वराज्याची योजना ही मूलभूत आणि सर्वस्पर्शी अशी आहे. प्रत्येक गावातील रहिवाशांनी बाह्य प्रलोभनाला बळी न पडता स्वतःचे गाव आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण बनविणे, तेथील शासकीय कारभार संपूर्णत: स्वतःच्या हातात ठेवणे आणि शिक्षण, आरोग्य आणि सांस्कृतिक गरजा, त्यांची व्यावहारिक उपयुक्तता लक्षात घेऊन स्वप्रयत्नाने भागविणे, ही ग्रामस्वराज्याची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

ग्रामराज्य हे एका व्यक्तीच्या किंवा अल्पसंख्य अथवा बहुसंख्य गटाच्या हितसंबंधाचे रक्षणकर्ते न होता सर्वांचे हिताचे रक्षणकर्ते बनावे, असे सांगून महात्मा गांधींचे अनुनुयायी व भूदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे यांनी 'सामर्थ्यवांनाच्या सामर्थ्याचा वापर जनतेच्या सेवेकरिता केले जावे, जनता पूर्णपणे स्वावलंबी व परस्पर सहकार्य करणारी असावी, नित्याचे सहकार्य वा प्रासंगिक असहकार अहिंसात्मकच असावा आणि समान परिश्रमाचा मोबदला समान असावा.' असे ग्रामस्वराज्याचे चार आधारस्तंभ सांगितले आहेत. 'बुद्धीने, शारीरिक बळ, आणि साधनसंपत्ती याबाबतीत सामर्थ्यवान असणाऱ्यांनी दुर्बलांचे रक्षण करावे.' या गांधीजींच्या विश्वस्त संकल्पनेचा आविष्कार ग्रामराज्याचा पाया व्हावा. स्वावलंबन हे ग्रामोद्योगांच्या विकासामुळे, जनतेतील ऐक्य हे अहिंसा आणि सहकार्य यांमुळे तर समता ही समान मोबदल्यामुळे प्रस्थापित होते, अशी यामागील श्रद्धा आहे.

अशा या महात्मा गांधींच्या आदर्शवादी ग्रामस्वराज्याच्या अथवा ग्रामविकासाच्या संकल्पनेवर डावे पुरोगामी आणि पूर्वास्पृशातील कार्यकर्ते आणि विचारवंत यांचा तिव्र आक्षेप असतो. कारण भारतीय गावगाड्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक संरचनेचा पाया विषमता, भेदभाव, स्तरीकरण आणि उच्च-निचता (श्रेष्ठ-कनिष्ठत्व) याने परिदृढ बनलेला आहे. शोषणात्याचार, दारिद्र्य, अरेरावी आणि दडपणूक ही वैगुण्य धारण केलेल्या ग्रामव्यवस्थेचा श्रेणीबध्द जाती संरचना हा कणा आहे. ग्रामाच्या श्रेणीबध्द जाती संरचनेत प्रत्येक जातींच्या पंरपरेने निश्चित व दृढ असलेल्या स्थानामध्ये आजही फारसा फरक पडलेला नाही. खेडयांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक संरचनेत झालेले बदलही फारसे समाधानकारक नाहीत. पूर्वास्पृश्य जातीतील एखादया व्यक्ती अथवा गटाने आपल्या पारंपारिक स्थानात परिश्रमपूर्वक बदल घडवून आणण्याचे प्रयत्न केल्यास त्या व्यक्ती अथवा गटाला संवर्णांच्या जबर शिक्षेला किंवा छळवणूकीला सामोरे जावे लागते. आज खेडयांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक संरचनेत कांही प्रमाणात स्थिलता आलेली आहे, पण तिची पक्कड मात्र नष्ट होऊ शकली नाही.

स्वावलंबी किंवा स्वंयपूर्ण खेडयांची म्हणजेच ग्रामस्वराज्याची अर्थातच महात्मा गांधींच्या परिभाषेत 'रामराज्याची' उभारणी करण्यासाठी खेडयांच्या पारंपारिक संरचनेत बदल करणे अनिवार्य ठरते; परंतु तसे बदल करण्यासाठी कोणती रणनीती वापरावी ? कोणता कार्यक्रम हाती घ्यावा ? या उलघडा होणे गांधींच्या 'ग्रामस्वराज्याच्या' परिणामकारक अंमलबजावणीसाठी आवश्यक ठरते. भारतीय संविधानाच्या चौथ्या भागात 'राज्यधोरणाची मार्गदर्शक तत्वे' या शीर्षकातंर्गत कलम ३८ मध्ये "(१) राज्य, त्यास शक्य होईल तितक्या परिणामकारकरीतीने सामाजिक, आर्थिक, राजकीय न्यायाद्वारे राष्ट्रीय जीवनाच्या सर्व घटकांमध्ये प्रेरणा निर्माण करील अशी समाजव्यवस्था प्रस्थापित करून व तिचे जतन करुन लोककल्याणाचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील."

"(२) राज्य हे केवळ, व्यक्ती-व्यक्तींमध्ये नव्हेतर विभिन्न क्षेत्रात राहणाऱ्या व विभिन्न व्यवसायामध्ये गुंतलेल्या लोकसमुहामध्ये देखील; उत्पन्नाच्या बाबातीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न करील आणि दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील राहील." आणि कलम ४० मध्ये "राज्य हे, ग्रामपंचायती संघटित करण्यासाठी उपाययोजना करील व त्यांना स्वराज्याचे मूळ घटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवकश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार बहाल करील." अशा ज्या तत्वांचा गांधीवादी तत्वे म्हणून अंतर्भाव केला गेला; ही तत्वे व या तत्वांच्या अंमलबजावणीसाठी उभारलेल्या संस्था आणि त्यांच्यामार्फत राबविल्या जात असलेल्या विकास योजना खेडयांच्या पारंपारिक सरंमजामी संरचनेत मुलगामी बदल करू शकल्या नाहीत. उलट या संस्थांचा व विकास योजनांचा राजरोसपणे वापर खेडयांची पारंपारिक सरंमजामी संरचना कायम ठेवण्यासाठी व बळकट करणासाठी केला जात असल्याचे आढळते. संविधानात अंतभूर्त असलेल्या गांधीवादी तत्वांच्या अंमलबजावणीसाठी सत्ताधारी वर्गाकडून आजपर्यंत केल गेलेले प्रयत्न मुख्यत: राजकीय सत्ता समीकरणाच्या डावपेचाचा भाग म्हणूनच केले गेल्याने गांधीना अपेक्षित असलेली ग्रामस्वराज्याची संकल्पना अस्तित्त्वात येऊ शकली नाही.

७३ व्या संविधान विशोधनाने त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेला संविधानिक दर्जा मिळाला. नियमित निवडणुकांद्वारे व्यापक प्रतिनिधित्वाच्या तरतुदींचा स्वीकार केला गेला. अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्ग आणि सर्व स्तरातील स्त्रिया यांच्या सक्रीय सहभागासाठी सदस्यत्वाबरोबर सत्ता पदांसाठी आरक्षण धोरण राबविण्यात आले. ग्रामपंचायतीच्या निर्णय प्रक्रियेतील प्रोढ मतदारांच्या सातत्यपूर्ण सहभागासाठी वर्षातून किमान दोन वेळा ग्राम सभेचे आयोजन करणे अनिवार्य करण्यात आले. या तरतुदी ग्रामस्वराज्याच्या दिशेने गावाची वाटचाल सुनिश्चित करण्यासाठी महत्वपूर्ण असल्यातरी त्याद्वारे ग्रामाच्या पारंपारिक संरमजामी संरचनेत मुलगामी बदल होत असल्याची कोणतिही लक्षणे दिसत नाहीत.

अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, भटक्या विमुक्त जाती-जमाती, इतर मागास जाती समुहातील दुर्बल व कमकुवत जाती आणि सर्व संवर्गातील स्त्रीया यांना आरक्षणाद्वारे प्रतिनिधित्वाच्या आणि सत्तापदांच्या प्राप्तीच्या ज्या विशेष संधी ७३व्या संविधान विशोधनाने पंचायत राज व्यवस्थेत उपलब्ध झाल्या; त्या संधींचा लाभ या समुहाना गावगाडयातील सधन व क्षत्रियत्वाचा दावा सांगणाऱ्या सरंमजामी वर्गाच्या मर्जी व हितासंबंधानुसारच जसा घ्यावा लागतो तद्वतच सत्तापदांच्या माध्यमातुन मिळालेल्या सत्तेचा वापरही त्यानुसारच करावा लागतो. शोषित समाजघटकातील ज्या जाती किंवा व्यक्ती आरक्षणाच्या माध्यमातुन मिळालेली राजकीय सत्ता स्वमर्जीने राबविण्याचा जेंव्हा प्रयत्न करतात तेंव्हा त्यांना प्रस्थापित सवर्ण जातीतील सरंमजामदारांच्या तिव्र विरोधाला तोंड दयावे लागते. प्रसंगी हिंस्र हल्यांना सामोरे जावे लागते. पंचायत राज व्यवस्थेतील सत्ता नाममात्र स्वरूपातच या सर्व शोषित जातींच्या वाटयाला कशी राहिल याचीच दक्षता सवर्ण जातींच्या धुरिणाकडून सातत्याने घेतली जाताना दिसते.

आपण आज जेंव्हा महात्मा गांधींच्या विचारातील ग्रामस्वराज्याची किंवा ग्रामविकासाची गोष्ट करतो, तेंव्हा जाती उतरंडीवर आधारलेल्या समाज व्यवस्थेतील अंगभूत विषमता आणि शोषणात्याचार कसे मोडून काढणार? गावगाडयाच्या प्रस्थापित व्यवस्थेत कसा संरचनात्मक बदल घडवून आणणार? या प्रश्नांची महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या अथवा ग्रामविकासाच्या संकल्पनेत न सापडणारी उत्तरे शोधणे गरजेचे ठरते. महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्याची पूनर्रचना भूदान आंदोलनाद्वारे करण्याच्या विनोबाच्या प्रयत्नाना व्यापक यश मिळू शकले नाही. स्वातंत्र्यानंतर गाव पातळीवर जातीपातीचा विचार बळकट होऊन ही आदर्श संकल्पना उध्वस्त केली गेली. गांधीवादी नेते-कार्यकर्त्यांनी ग्रामस्वराज्याच्या संकल्पनेचे सुट्या-सुट्या स्वरुपात यशस्वी केलेले किंवा केले जात असलेले कांही प्रयोग व्यापक स्वरुपाच्या यशात परावर्तीत होऊ शकले नाही. लोकशाही जीवन व्यवहारांची तळपातळीवरील प्रक्रिया गतिमान करण्यासाठी लोक चळवळ उभी करणे आणि त्याधारे समाजातील सरंजामी जातीय मानसिकतेला तिलांजली देणे महात्मा गांधीप्रणीत आदर्शवादी ग्रामस्वराज्याची संकल्पना वास्तवात उतरविण्यासाठी आवश्यक ठरते.

**संदर्भ**

१. Gandhi, M. K. *Rebuilding Our Villages*, Ahmedabad, 1952.

२. Malaviya, H. D. *Village Panchayats in India*, New Delhi, 1956

३. भावे विनोबा, *सर्वोदय विचार और स्वराज्य-शास्त्र*, काशी

४. यशवंत सुमंत, महात्मा गांधींची विचारसृष्टी, कांही अलक्षित पैलू ,साधना प्रकाशन.पुणे.

५. मिलिंद बोकील, ग्रामस्वराज्य आणि स्वशासन:एक अभ्यास, विदर्भ उपजीविका मंच.

६. मराठी विश्वकोश